# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


प्रेस नोट क्र-१५५ दिनांक - २३/०४/२०२४

## मोटारसायकल व ऑटो रिक्षा चोरीचे ०४ गुन्हे उघडकीस आणुन रु. २,००,०००/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात माणिकपुर पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकास यश

माणिकपुर पोलीस ठाणे हद्दीमध्ये दिनांक १६/०४/२०२४ रोजी तक्रारदार श्री. दिलीपकुमार विजु मकवाना, वय ४३ वर्षे, रा. रुम नं. ७०४, भामनी संकुल, टिवरी रोड, नायगांव पुर्व, जि. पालघर यांनी त्यांची हिरो कंपनीची स्ट्रिट मोटारसायकल ही नायगांव रेल्वे स्टेशन पश्चिम येथे सार्वजनिक रोडचे कडेला उघडयावर पार्क करुन ठेवली असता कोणीतरी अज्ञात इसमाने स्वतःचे फायदयाकरीता चोरी केल्याने त्यांनी दिलेल्या तक्रारीवरुन गु.र.क्र. १३२/२०२४ कलम ३७९ भा.दं.वि. प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला.

माणिकपुर पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी सि.सि.टि.व्ही. कॅमेरे व गुप्त बातमीदार व तांत्रिक मदतीने आरोपी नामे १) मोहम्मद सैबाज मोहम्मद हानिफ मनिहार, वय २४ वर्षे, रा. रुम नं. ०३, तुलसी नगर चाळ, टेकडी मस्जिदच्या बाजुला, बावशेतपाडा, वसई पुर्व, जि. पालघर यास त्याचे राहते घराचे परीसरामध्ये सापळा लावुन शिताफीने पकडले व त्यांना अटक करण्यात आली आहे. तपासादरम्यान अटक आरोपीत याचेकडुन रु. २,००,०००/- किंमतीच्या ०३ मोटारसायकल व ०१ ऑटो रिक्षा हस्तगत करुन ०४ गुन्हयांची उकल करण्यात आली आहे.

**<u>उघडकीस आलेले गुन्हे :-</u>**

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गु.र.क्र. व कलम |
|---|---|---|
| १. | माणिकपुर पोलीस ठाणे | गु.र.क्र. २५/२०२४ कलम ३७९ भा.दं.वि. |
| २. | माणिकपुर पोलीस ठाणे | गु.र.क्र. ८५/२०२४ कलम ३७९ भा.दं.वि. |
| ३. | माणिकपुर पोलीस ठाणे | गु.र.क्र. ८८/२०२४ कलम ३७९ भा.दं.वि. |
| ४. | माणिकपुर पोलीस ठाणे | गु.र.क्र. १३२/२०२४ कलम ३७९ भा.दं.वि. |

सदरची कारवाई श्रीमती पौर्णिमा चौगुले/श्रिंगी, पोलीस उप आयुक्त परिमंडळ ०२, श्रीमती पद्मजा बडे, सहाय्यक पोलीस आयुक्त वसई, श्री. राजु माने, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. संतोष चौधरी, पोलीस निरीक्षक (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण अधिकारी पो.उ.नि. सनिल पाटील, पो.ह. शैलेश पाटील, पो.ह. शामेश चंदनशिवे, पो.ह. धनंजय चौधरी, पो.शि. गोविंद लवटे, पो.शि. आनंदा गडदे, पो.शि. प्रविण कांदे, म.पो.शि. पुजा कांबळे, व पोलीस उप आयुक्त कार्यालय, परिमंडळ ०२ चे पो.ह. भालचंद्र बागुल, पो.शि. अमोल बर्डे, पो.शि. मोहन खंडवी यांनी यशस्विरीत्या पार पाडली आहे.

